**नियमीत दिवाणी मुकदमा क्र.१३/२०११**
**वादीतर्फे साक्षीदार क्र.१**
**निशाणी क्र.४२ पुढे सुरु**

**उलटतपास प्रतिवादी यांचेतर्फे विधीज्ञ श्री.यु.एन.शिंदे यांचेमार्फत शपथेवर सुरु**

१०. वादी क्र.२ यांनी मला मुखत्यार दिलेले नाही. मी जिल्हा परिषद शाळा, डेरेवाडी, ता.जावली, जि.सातारा येथे शिक्षक आहे. मला ३० ते ३१ वर्षे झाली. मी डेरेवाडीमध्ये कधी राहतो कधी येवून जावून करतो. डेरेवाडी माझ्या गावापासून २ किलोमीटर आहे. एकनाथ महादेव निकम हे वहिवाटीला अडथळा आणतात म्हणून त्यांना दाव्यात पक्षकार केलेले आहे. गटात ग्रामपंचायतीचे नांव असल्यामुळे ग्रामपंचायतीला पक्षकार केलेले आहे. गटामध्ये एकनाथ याचेदेखील नाव आहे. गट नं.३०९ आहे. मी उताऱ्यामध्ये प्रतिवादींची नांवे का आली त्याबाबतचा फेरफार पाहिलेला आहे. खरेदीदस्ताच्याआधारे प्रतिवादी यांच्या नोंदी झाल्याचे दिसत आहे. १९८६ च्या आसपास प्रतिवादी क्र.१ ला खरेदी दिल्याचे दिसत आहे. भाऊ केसू जाधव यांची पत्नी खरेदी देणार असे फेरफारमध्ये दिसत आहे. नाव मला आठवत नाही. प्रतिवादी क्र.२ चे १९८७-८८ दरम्यान खरेदीपत्र झाले. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीच्या दिनांकापासून प्रतिवादी यांची वहिवाट त्याठिकाणी आहे.

प्रश्न – १९८६ सालापासून दावा दाखल करेपर्यंत तुमचे नांव ७/१२ व पिकपाण्यास लागलेले आहे का ?

उत्तर – एक वर्ष लागले.

माझे नांव १९८८ साली ७/१२ ला लागले होते. तसा उतारा मी दाखल केलेला नाही. दावा दाखल करताना सदर उतारा मी का दाखल केला नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. १९८८ साली दावा मिळकतीस नाव लावणेकामी वहिवाट केस तहसिलदार यांच्याकडे केली होती. सदर वहिवाटचा निकाल हा माझ्या बाजूने तहसिलदारकडे झाल्यानंतर तो वाद आयुक्त यांच्याकडे गेला व आयुक्तांनी माझ्याविरुध्द निकाल दिला. त्यानंतर मी उच्च न्यायालय किंवा इतर ठिकाणी दाद मागितलेली नाही. फक्त कोर्टातच आलो. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीत माझी मालकी, कब्जा व वहिवाट नाही. हे

म्हणणे खरे नाही की, कब्जाबाबत माझ्या पूर्वजांचे कब्जा होता हे दाखविणारे कागदपत्र मी दाखल केलेले नाही. १९४३ साली आमच्या वडीलांनी निकम या व्यक्तींच्या विरोधात दावा दाखल केला होता तो आमच्याविरोधात झाला त्याच्याशी प्रतिवादींचा काहीही संबंध नाही. त्याचा सर्व्हे नं.४४/८ असा होता. १९४४ नंतर आमची मालकी असणारे ७/१२ उतारे आहेत ते दाखल केलेले नाहीत. एकनाथरावांनी किती हिस्सा विकत घेतला हे मला सांगता येणार नाही. प्रतिवादी क्र.२ ने ४ गुंठे घेतली. प्रतिवादी यांच्या ७/१२ वरील नावाच्या नोंद कमी करण्यासाठी तहसिलदार, प्रांत यांच्याकडे तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीत आमच्या पूर्वजांची समाधी होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीत आमची मालकी नाही, कब्जा नाही व कारण नसताना हा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, १९८६ पासून प्रतिवादी दावा मिळकतीमध्ये वहिवाट करतात, पिकं घेतात. हे म्हणणे खरे नाही की, १९८६ पासून दावा दाखल करेपर्यंत मालकी असणारा कोणताही कागद माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही जाधवांची मुळ प्रॉपर्टी होती त्याच्याशी निकमांचा काहीही संबंध नाही. प्रतिवादींनी खरेदी केलेल्या खरेदीपत्र रद्द करण्याकामी कोर्टात दावा आणलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीशी आमचा कोणताही संबंध नसताना मी खोटा दावा दाखल केलेला आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/-

**ठिकाण** : मेढा
आर.बी.खवले,

**दिनांक** : १९.०७.२०२२
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मेढा.**